**नियमित दिवाणी दावा क्र. १७२/२०२४ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश**
**रेवणसिध्द बिराजदार वि. पैगंबर तांबोळी व इतर**
**MHSO180012122024**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा तहसिलदार, मंगळवेढा यांनी प्रकरण क्र. रस्ता/कलम१४३/एसआर/१/२०२३ मध्ये दिलेला आदेश बेकायदेशीर असून, तो वादीच्या मिळकतीवर बंधनकारक नसल्याचे जाहिर होवून मिळण्यासाठी व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत कसल्याही प्रकारचा रस्ता तयार करु नये, अशी निरंतर ताकिद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार, दावा कलम १अ ही मिळकत वादी यांच्या स्वतंत्र मालकी कब्जेवहिवाटीची असून, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही हक्क व अधिकार नाही. वादीच्या मिळकतीच्या पूर्वेस प्रतिवादी क्र. १ यांचे मालकीची गट क्र. ४७४ ही मिळकत असून, गट क्र. ४७२ ही मिळकत प्रतिवादी क्र. २ यांच्या मालकीची आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या गट क्र. ४७४ व ४७२ मध्ये जाणे-येणे करिता रस्ता मिळणेबाबत तहसिलदार, मंगळवेढा यांचेकडे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांना त्यांच्या मिळकतीतून खरेदीखतात नमूद असलेला रस्ता उपलब्ध असल्याचे दाखवून दिले होते. परंतू, तहसिलदार यांनी त्याचा विचार न करता, केवळ प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याशी संगनमत करुन सोयीचा रस्ता म्हणून बेकायदेशीरपणे आदेश पारित केला. प्रतिवादी यांचे मिळकतीचे खरेदीपत्रामध्ये गट क्र. ४७४ चे उत्तरेकडून पश्चिम बाजूने जाणे-येणेकरिता १० फुट रुंदीचा रस्ता नमूद आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांच्या मिळकतीलगत सरकारी रस्ता असून, केवळ वादी यांना त्रास देण्यासाठी वादीचे मिळकतीचे पूर्व बांधावरुन नविन रस्त्याची मागणी केलेली आहे. प्रतिवादी यांनी वस्तुस्थिती लपवून कलम १४३ प्रमाणे अर्ज दाखल केला होता. तहसिलदार, मंगळवेढा यांनी प्रत्यक्ष जागेवर न जाता चुकीचा स्थळपाहणी पंचनामा केलेला आहे. सदर पंचनाम्यावर वादी यांची सही नाही. त्यामुळे पंचनामा खोटा असल्याचे स्पष्ट होते. वादी यांनी सदर अर्जाच्या कामी दिलेले म्हणणे व कागदपत्राचे अवलोकन न करता, तहसिलदार, मंगळवेढा यांनी प्रतिवादींचा अर्ज मंजूर केलेला आहे. सदर निकालाची समज

वादीस उशिराने दि.२९.०७.२०२४ रोजी प्राप्त झाली. सदर आदेशाच्या आधारे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दि.३१.०७.२०२४ रोजी वादीच्या मिळकतीतील बेकायदेशीरपणे रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादी यांना समजावून सांगून सुध्दा त्यांनी ऐकले नाही. तहसिलदार, मंगळवेढा यांचा सदरचा आदेश मुळतः बेकायदेशीर व रद्दबातल असा आहे. प्रतिवादी यांनी सदर आदेशाच्या आधारे नविन रस्ता तयार केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तहसिलदार, मंगळवेढा यांचे आदेशाआधारे वादीच्या मिळकतीत अतिक्रमण करुन रस्ता केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त ताकिद देणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांना वहिवाटीचा रस्ता उपलब्ध असल्याने, मनाई दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. १५ अन्वये तुर्तातूर्त मनाई अर्जावर म्हणणे दाखल केले. प्रतिवादी यांनी दाव्यातील व मनाई अर्जातील कथने खोटी असल्याचे कथन केले असून, दावा व मनाई अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांच्या जमिनीमध्ये जाणे–येणेकरिता कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याने, त्यांनी तहसिलदार मंगळवेढा यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे नविन रस्ता मिळणेकरिता अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाची नोटीस वादी यांना बजावण्यात आली होती. त्यानंतर दि.२०.०६.२०२३ रोजी तहसिलदार, मंगळवेढा यांनी स्वतः जागेवर जावून, स्थळपाहणी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, प्रतिवादी क्र. १ व २ यांना कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. सदर अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र. ९ व १३ यांनी हजर होवून म्हणणे दाखल केले होते. परंतू वादी यांना नोटीसची व स्थळपाहणीची बजावणी होवून देखील वादीने हजर राहून म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे वादीस सदरचा अर्ज मान्य असल्याचे दिसून येते. तहसिलदार, मंगळवेढा यांनी स्थळपाहणी करुन वादी व प्रतिवादी यांचे कमीत कमी नुकसान होईल अशा प्रकारे उंबरज–नंदुर या सरकारी रस्त्यापासून उत्तरेकडून दक्षिणेकडे गट क्र. ४७४ च्या पश्चिम बांधावरुन गट क्र. ४६८/१/अ च्या पूर्व बांधावरुन नविन रस्ता करण्याबाबत आदेश केलेला आहे. सदरच्या रस्त्याशिवाय प्रतिवादी यांना इतर कोणताही रस्ता उपलब्ध नाही. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये सदर अर्जामध्ये म्हणणे दिल्याचे कथन केलेले आहे. परंतू, वादीने सदर अर्जाकामी हजर राहून कोणतेही म्हणणे

दाखल केलेले नाही. यावरुन वादी खोटे बोलत असल्याचे सिध्द होत आहे. गट क्र. ४७४ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या मालकीची असून, सदरची मिळकत प्रतिवादी क्र. ३ चे पती व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचे वडिल यांच्या वडिलोपार्जित मालकीची होती. त्यांनी सदर मिळकतीपैकी ८१ गुंठे इतके क्षेत्र दशरथ आठवले यांना आर्थिक अडचणीपोटी विक्री केले होते. त्यानंतर सन २००४ मध्ये दशरथ आठवले यांनी सदरची मिळकत प्रमिला तुपलोंढे यांना विक्री केली आहे. त्यांच्याकडून प्रतिवादी क्र. १ ने खरेदी केलेली आहे. वादीस दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. तसेच दावा मुदतीत नाही. दाव्यास आवश्यक पक्षकार या तत्वाची बाधा येते. वादीचा तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर केल्यास, प्रतिवादी क्र. १ व २ यांचे नुकसान होणार आहे. याउलट मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील वादप्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्याखालील दिलेल्या कारणांसाठी मी त्यांचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे लाभात प्रथमदर्शनी केस असल्याचे वादींनी सिध्द केले काय? | नाही |
| २. | वादीचे लाभात न्यायाचा समतोल असल्याचे वादीनी सिध्द केले काय? | नाही |
| ३. | मनाई हुकून न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल, असे वादीनी सिध्द केले काय? | नाही |
| ४. | आदेश कोणता? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

५. प्रस्तुत अर्जाच्या पृष्टयर्थ वादी यांनी कागदपत्रे यादी नि.क्र.४ व १९ सोबत कागदपत्रांची छायांकित प्रती दाखल केली आहेत. प्रतिवादीतर्फे नि.क्र. २३ सोबत शासन निर्णयाची प्रत दाखल केली आहे.

६. सकृतदर्शनी केस म्हणजे दिवाणी पक्षकाराने त्याचे कायदेशीर कथनांबाबत सबळ पुरावा सादर करणे होय. याठिकाणी सकृतदर्शनी केस शाबीत करताना वादींना त्याच्या दाव्यातील कथनांतील सर्व बाबी संदर्भात सबळ पुरावा देणे गरजेचे आहे. परंतू जर वादीस त्याचे मागणीस दुजोरा देणारा सबळ पुरावा मांडता आला नाही, तर प्रतिवादीच्या हक्कात निर्णय देणे अनिवार्य ठरते. कारण दिवाणी केसमध्ये न्यायालयास स्वतःची बाजू पटवून देण्याची प्रथम व महत्वपूर्ण जबाबदारी ही नेहमी वादीचीच असते.

<u>वादप्रश्न क्र.१ ते ३ करिता</u> :

७. सदरचे तिन्ही वादप्रश्न एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

८. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांच्या मिळकतीत जाण्यासाठी गट क्र. ४७४ च्या उत्तरेकडून पश्चिम बाजूने जाणे–येणे करिता १० फुट रुंदीचा रस्ता असल्याचे त्यांचे खरेदीखतामध्ये नमूद आहे. असे असताना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी गट क्र. ४७४ व ४७२ या मिळकतीमध्ये जाणे–येणे करिता तहसिलदार, मंगळवेढा यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमचे कलम १४३ प्रमाणे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाकामी वादीने म्हणणे दाखल करुन प्रतिवादीस पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याबाबत म्हणणे दाखल केले होते. परंतू, तहसिलदार यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याशी संगनमत करुन बेकायदेशीरपणे केवळ सोयीचा रस्ता म्हणून आदेश पारित केलेला आहे. तहसिलदार यांनी चुकीचा स्थळपाहणी पंचनामा केलेला आहे. पंचनाम्यावर वादीची सही नाही. त्यामुळे पंचनामा खोटा असल्याचे सिध्द होते. वादी त्यांच्या कथनापृष्टर्थ्य दाखल केलेला तहसिलदार, मंगळवेढा यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी व इतर प्रतिवादी यांच्याविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ प्रमाणे अर्ज दाखल करुन रस्त्याची मागणी केल्याचे दिसून येते.

सदर अर्जाकामी त्यातील गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन, त्यांच्या मिळकतीतून रस्ता देण्यास हरकत असल्याचे नमूद करुन गट क्र. ४७४ च्या पश्चिम बाजूने रस्त्याने वहिवाट करण्यास हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच स्थळ निरीक्षण पंचनाम्याचे अवलोकन करुन गट क्र. ४७४ व ४७२ मध्ये येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने व त्यामुळे गैरअर्जदार यांच्या गटाच्या हद्दीवरुन रस्ता देणे आवश्यक वाटत असल्याचे, स्थळ निरीक्षण अहवालावरुन नमूद केलेले आहे. वादी यांनी जरी तहसिलदार, मंगळवेढा यांनी प्रत्यक्ष जागेवर न जाता चुकीचा स्थळपाहणी केल्याचे व पंचनाम्यात वादी यांची सही नसल्याचे कथन केले आहे. याउलट प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादीस स्थळपाहणीची नोटीस मिळून देखील वादीने हजर राहून म्हणणे दाखल केले नाही. वादी यांनी प्रतिवादी यांना दुसरा पर्यायी रस्ता असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्याबाबत दोन्ही बाजूंची परस्परविरोधी कथने पाहता, त्याबाबत दोन्ही बाजूंचा सविस्तर पुरावा येणे आवश्यक आहे. परंतू, सद्यस्थितीत, वादीस प्रथम दर्शनी केस आहे, असे म्हणता येणार नाही. न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत मनाई अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविले आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.४ करिता</u> :**

९. वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्षाच्या अनुषंगाने, मी वादप्रश्न क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## :: आदेश ::

१. वादीचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या निकालाच्या वेळी ठरविण्यात येईल.

MEGHA SHASHIKANT MALI Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI Date: 2026.03.17 16:20:42 +0530

(एम. एस. माळी)

दिनांक – १३/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order decided on : 13.03.2026

(d) Order uploaded on : 13.03.2026